# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/७०३ /२०२५ दि.१७/०५/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत ठाणे घोडबंदर राज्य मार्ग ८४ या रस्त्यावरील गायमुख घाटामधील ठाणे कडुन घोडबंदरला जाणाऱ्या रस्त्याच्या पृष्ठभाग मायक्रो सर्फेसींग करण्यात येणार आहे. सदरचे काम दिनांक १८/०५/२०२५ रोजी ते दिनांक २०/०५/२०२५ रोजी सकाळी १२:०० ते सायंकाळी १७:०० वा. पावेतो करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील प्रमाणे **वाहतुकीत बदल** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

### अ) ठाणे घोडबंदर वाहीनी

**प्रवेश बंद –** १) मुबई, ठाणे कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहनांना **वाय जंक्शन व कापुरबावडी जक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे

**पर्यायी मार्ग –** अ) मुबई, ठाणे कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहने ही वाय जंक्शन येथुन सरळ नाशिक रोडने खारेगाव टोलनाका मानकोली, अंजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) मुबई, ठाणे कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहने ही कापुरबावडी जक्शन जवळुन उजवी कडे वळण घेउन कशेळी,अजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंब्रा ,कळवा कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहनांना **खारेगाव टोल नाका येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** मुंब्रा, कळवा कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व वाहने खारेगाव खाडी ब्रिजखालुन ,खारेगाव टोलनाका, मानकोली, अजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) नाशिक कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहनांना **मानकोली नाका येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** नाशिक कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहने ही मानकोली ब्रिज खालुन, उजवी कडे वळण घेउन अजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

### ब) घोडबंदर ठाणे वाहीनी

**प्रवेश बंद –** १) गुजरात कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणारे सर्व जड अवजड वाहनांना **चिंचोटी नाका येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

२) मुबई, विरार वसई कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणारे सर्व जड अवजड वाहनांना **फाऊटंन हॉटेल जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** गुजरात, मुबई, विरार वसई कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणारे सर्व जड ,अवजड वाहने ही **चिंचोटी नाका येथुन कामण, अंजुर फाटा, माणकोली भिंवडी** मार्गे इच्छित स्थळी जातील.

**सदर वाहतूक अधिसूचना दिनांक १८/०५/२०२५ रोजी ते दिनांक २०/०५/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वा ते रात्रौ २३:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

CS CamScanner

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
**पोलीस उप आयुक्त,**
**वाहतूक विभाग, ठाणे शहर**

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत मा. सविनय सादर**

मा.जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
मा.अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
मा.अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा.पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा—भाईंदर वसई—विरार.
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**

मा.पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई.
मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
मा.पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.
मा.पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
मा.पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा—भाईंदर वसई—विरार.
मा.पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ — १ ठाणे, परिमंडळ — २ भिवंडी, परिमंडळ — ३ कल्याण, परिमंडळ — ४ उल्हासनगर, परिमंडळ — ५ वागळे इस्टेट.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी.

**प्रत** :— आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**प्रत** :— मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/— सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदर अधिसूचना निर्गमित करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कासारवडवली, कापूरबावडी, कळवा, नारपोली, भिवंडी, मुंब्रा, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर

**प्रत** :— सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CamScanner